जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

## प्रेसनोट क्रमांक - ३९३ दिनांक - २६/०५/२०२३

### युनिट ०१ गुन्हे शाखा,पुणे शहर

### चरसची विक्री करुन घातकशस्त्राचा साठा बाळगणारा केला जेरबंद

दिनांक २५/०५/२०२३ रोजी युनिट ०१ कडील **पोलीस अंमलदार अनिकेत बाबर** यांना बातमी मिळाली की, ऑर्चिड बिल्डींग,सदाशिव पेठ, नातुबाग, पुणे येथे एक इसम चरसची विक्री करीत आहे. अशी बातमी प्राप्त झाल्याने लागलीच आम्ही सदरची बातमी युनिट-१ चे प्रभारी अधिकारी श्री.शब्बीर सय्यद यांना कळविली.

त्यांनी तात्काळ प्राप्त बातमीचे अनुषंगाने कारवाई करण्याचे आदेश दिले. त्यांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शना प्रमाणे युनिट १ कडील अधिकारी व अंमलदार यांनी सदर ठिकाणी सापळा रचुन एका इसमांस ताब्यात घेतले असता त्याचे नाव पत्ता विचारले असता त्याने आपले नाव पत्ता **सागर सुभाष मोडक वय ४३ वर्ष रा १३६७ सदाशिव पेठ, ऑर्चिड बिल्डींग, पुणे** असे असल्याचे सांगीतले. सदर इसमाची झडती घेतली असता त्याचे खिशात मिळून आलेल्या काळ्या चिकट व कडक पदार्था मधील अत्यंत अल्प प्रमाणातील तुकड्याची सोबतच्या ड्रग्ज डिटेक्शन किटव्दारे तपासणी केली असता सदरचा पदार्थ हा चरस असल्याचे प्राथमिक दृष्ट्या निष्पन्न झाले. त्यांची अंगझडती व घरझडतीमध्ये किं **५,१९,०००/- रु चरस अंमली पदार्थ ३५२ ग्रॅम, ६५५०/- रु ची ३ तलवार, २ कुकरी, १ सत्तुर, १ कु-हाड, १ चाकु, १ रापी अशी बैकायदेशिररित्या हत्यारे व किं रू १६०००/- च्या एकुण ३२ नग चिलीम** विक्री करीता मिळाले असा सर्व मिळून **५,७२,०५० रू किं.चा** माल जप्त करण्यात आला आहे.

सदर इसमास पुढील कारवाई कामी खडक पोलीस स्टेशन पुणे शहर यांचे ताब्यात देण्यात आलेले आहे.

सदरची कामगिरी मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर, श्री रितेश कुमार,मा.पोलीस सह आयुक्त, पुणे शहर, श्री संदिप कर्णिक, मा.अपर पोलीस आयुक्त, गुन्हे श्री.रामनाथ पोकळे ,मा. पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, पुणे शहर, श्री अमोल झेंडे मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे-१, पुणे शहर श्री.सुनिल पवार,यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक शब्बीर सय्यद युनिट ०१,सपोनि अशिष कवठेकर,पोलीस उप निरीक्षक सुनिल कुलकर्णी, पो.उप.नि. अजय जाधव, पोलीस अंमलदार अनिकेत बाबर,राहुल मखरे, शशिकांत दरेकर, दत्ता सोनावणे, विठ्ठल साळुंखे, तुषार माळवदकर म.पोलीस अंमलदार रुक्साना नदाफ,यांनी केली आहे.